


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७५६. वा | मंगळवार | दि. ३० एप्रिल २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# महाराष्ट्रात जास्त जागा असूनही मुख्यमंत्री पदाचा त्याग का केला?- पंतप्रधान नरेंद्र मोदी...

**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या दोन टप्प्यांचं मतदान झालं आहे तर आणखी पाच टप्प्यांचं मतदान बाकी आहे. महाराष्ट्रातल्या निवडणुकांकडे देशाचं लक्ष लागलं आहे कारण मागच्या पाच वर्षांमध्ये राज्यात न भुतो न भविष्यती अशा घटना घडल्या आहेत. महाराष्ट्रातल्या या एकूणच राजकीय परिस्थितीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहिल्यांदाच विस्तृतपणे भाष्य केलं आहे.एक वृत्तवाहिनीने पंतप्रधान नरेंद्र मोदींची मुलाखत घेतली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना महाराष्ट्रातली राजकीय परिस्थितीवर प्रश्न विचारला. भाजप पहिल्या क्रमांकाचा पक्ष असूनही मुख्यमंत्रिपद शिवसेनेला का दिलं गेलं? भाजपने हा त्याग का केला? याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. आज शिंदेंच्या नेतृत्वात जे सरकार चाललं आहे. भाजपच्या जास्त जागा असूनही त्याग केला. महाराष्ट्राच्या भल्यासाठी त्याग केला. आम्हाला मुख्यमंत्री व्हायचं होतं म्हणून असं केलं असं काहींना वाटत होतं पण असं नाही. आम्ही महाराष्ट्राला हे सांगितलं की असं नाहीय. आम्ही महाराष्ट्रासाठी जगतो, आमच्यासाठी जगत नाही हे लोकांना सांगितलं. त्यामुळे सहानुभूती आमच्याबाजूने आहे. इतका मोठा पक्ष, एक यशस्वी मुख्यमंत्री आज उपमुख्यमंत्री बनून, एक प्रकारे स्वत: चा सन्मान सोडून आज भाजप फक्त महाराष्ट्राच्या उज्वल भविष्यासाठी ही भूमिका घेत आहे, अशी प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिली. देशात बंगाल उद्ध्वस्त झालं, राजकारणाने सगळं उद्ध्वस्त झालं, बिहार, उत्तर प्रदेशला अस्थिर राजकारणाने उद्ध्वस्त करून टाकलं. महाराष्ट्रात



असं होऊ द्यायचं नव्हतं, मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. आपल्याला देशहितासाठी महाराष्ट्रात पुढे जायला हवं आणि हे आम्ही महाराष्ट्राच्या जनतेला सांगत आहोत. महाराष्ट्राच्या जनतेकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ठामपणे सांगितलं.

## अल्पवयीन मुलीस पळून नेल्याप्रकरणी सुनगाव येथील तरूणावर गुन्हा दाखल...



**जनसंचलन/ जळगाव जा.**

जळगाव जा. तालुक्यातील एका गावातील १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला गावातीलच २४ वर्षीय तरुणाने फुस लावून पळवून नेल्याची घटना २५ एप्रिल रोजी रात्री ८ च्या सुमारास घडली. मुलगी घरच्यांना शौचास जाते म्हणून घराच्या बाहेर पडली व ती रात्री उशिरापर्यंत घरी आली नाही. म्हणून आई-वडिलांनी तिला शेजाऱ्यांच्या घरी व नातेवाईकांकडे शोधले परंतु ती मिळून आले नाही. नातेवाईकांसह मुलीचे पिता यांना सुनगावातील अमोल गजानन वसतकार हा पण घरी नसल्याचे यावेळी पळवून नेलेल्या मुलीच्या पित्याने सुनगाव येथील अमोल गजानन वसतकार याच्या विरोधात जळगाव जामोद पोलीस स्टेशनला जाऊन मुलीला फूस लावून पळविल्याची तक्रार दिली सदरच्या तक्रारीवरून पोलिसांनी अमोल वसतकार याच्या विरोधात अप नंबर २५२/२०२४ कलम ३६३ नुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास ठाणेदार आनंद महाजन यांच्या मार्गदर्शनात स. पो. नि. पांडुरंग इंगळे करीत आहेत.

## शेवटी त्या प्रकरणाचा लागला छडा त्या आरोपींना मिळाली जन्मठेपाची शिक्षा

**जनसंचलन/बुलढाणा**

येणारी वेळ आणि काळ कसा येणार हे काही सांगता येत नाही मात्र झालेल्या घटनावर न्याय मिळतो हे मात्र खरं असाच एक प्रकार बुलढाणा जिल्ह्यात घडला होता. महाराष्ट्रापासून शेकडो किलोमीटर दूर असलेल्या पश्चिम बंगालमधील एका कामगाराचा चिखली जवळील बेरळ्यात खून करण्यात आला होता त्याप्रकरणी न्यायालयाने दोन आरोपींना जन्मठेपाची शिक्षा दिली आहे विशेष म्हणजे असे की खून करणारे आरोपी हसमुख आणि मुन्नाभाई हे सुद्धा बाहेर राज्यातील आहेत. सविस्तर वृत्त असे की मोहम्मद हुसेन मोहम्मद नुरयेजमल वय ३४ रा. बोन्हा बीरभूम पश्चिम बंगाल हा दिनांक २ जून २०२२ पासून जस्ट किचन कंपनी बेरळा येथे सफाई कामगार म्हणून कार्यरत होता. याच कंपनीमध्ये आरोपी हसमुख उर्फ मोहम्मद इम्दादूल लष्कर वय ३२ रा. लिलबगान हा मुकरदम म्हणून तर आरोपी मुन्नाभाई उर्फ मुजम्मील शेख अबीद हुसेन हा सुपरवायझर म्हणून काम करत होता दिनांक १५ ऑगस्ट २०१२ सफाई कामगार हुसेन हा दारू पिऊन गेटवर आल्याने त्याला कामावर घ्यायचे अथवा नाही याबाबत गेटवरील वॉचमन यांनी हसमुख आणि मुन्नाभाई यांना विचारणा केले असता त्यांनी मृतक यास कामावर घेण्यास नकार दिला. त्यावेळी मृतक व आरोपी यांच्यामध्ये कामावर न घेण्याच्या कारणावरून बोल चाल झाली होती. तर रात्री नऊ ते दहा वाजेच्या दरम्यान मृतक हुसेन वाचमन यांची नजर चुकवून कंपनीच्या किचन हॉलमध्ये गेला असता त्याचे मांगे आरोपी हसमुख हा देखील त्या ठिकाणी गेला त्यावेळी त्यांच्यामध्ये परत कामावर न घेण्याच्या कारणावरून वाद झाला व आत्मक याने मृतात यास सिमेंट्च्या पायऱ्यावरून भांडे धुण्याच्या मशीन पर्यंत उडत नेऊन फावड्याने त्याच्या डोक्यात वार केला. तर परत दिनांक १६ ऑगस्ट २०२२ च्या सकाळी साडेपाच वाजेच्या दरम्यान दोन्ही आरोपींनी पुन्हा याच कारणावरून कंपनीच्या गेट समोर मृतक हुसेन यास चापट बुक्यांनी मारहाण करून त्याचे दोन्ही पाय धरून पडले व हसमुख ने स्टीलचे रोडने त्याच्या डोक्यात



वार करून दोघांनी मृतक यास जीवानिशी ठार मारले. यावरून कंपनीचे वाचमेन सुखदेव साळुंखे यांनी १६ ऑगस्ट २०२२ रोजी चिखली पोलीस स्टेशनला सदर गुन्ह्याची फिर्याद केली त्या आधारे दोन्ही आरोपी विरुद्ध कलम ३०२ ३४ माधवी नुसार गुन्हा दाखल करून करून सदर तपास पोलीस उपनिरीक्षक राजेश चव्हाण यांच्याकडे सोपविण्यात आला तपासा दरम्यान सगळ्या गोष्टीची पूर्तता झाल्यानंतर संबंधित तपास अधिकारी यांनी दोषारोप पत्र विद्यमान न्यायालयात दाखल केले. सगळे पुरावेच्या आधारे विद्यमान प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री स्वप्निल खडी साहेब यांनी दोन्ही आरोपींना कलम ३०२ ३४ अन्वये दोशी ठरवून दोघांना जन्मठेप व प्रत्येकी रुपये पाचशे रुपये दंड अशा प्रकारची शिक्षा आज २९ एप्रिल रोजी सुनावली आहे

# बुलडाणा येथील एसटी विभाग नियंत्रक यांची आर्थिक व्यवहाराची चौकशी करा - गजानन माने

## व्यवस्थापकीय संचालक रा.प. मध्यवर्ती मुंबई यांच्याकडे निवेदनाव्दारे कामगार सेनेची मागणी...

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलडाणा येथील विभाग नियंत्रक यांनी कर्मचारी यांचेकडून केलेले आर्थिक व्यवहार तसेच कर्मचाऱ्यांची पिळवणूक केल्याप्रकरणी त्यांची चौकशी करण्यात यावी, या मागणीसाठी व्यवस्थापकीय संचालक रा.प. मध्यवर्ती मुंबई यांच्याकडे २३ एप्रिल २०२४ रोजी एका निवेदनाव्दारे केली आहे

दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, बुलडाणा विभागातील महाराष्ट्र एस. टी. कामगार सेनेच्या पदाधिकारी, सभासद यांचेवर जेष्ठता डावलून के. टी. सोनुने स.वा.नी. हे विभागीय कार्यालयात सर्वात जेष्ठ असतांना त्यांना डावलून सर्वात कमी जेष्ठा कर्मचाऱ्यांना मोठा आर्थिक व्यवहार करून वाहतूक निरिक्षक पदाची बढती दिली आहे. बढती, बदल्या, नियुक्तीवर रापचे सर्व नियम डावलून फक्त जो आर्थिक व्यवहार करून तसेच प्रतिनियुक्ती चालक यांना नियुक्ती देण्याकरीता विभागातून अर्ज मागविले होते, यामध्ये चालकांचे नांव पाठवितांना बुलडाणा विभागात कोणतीही सेवा जेष्ठता न पाहता व अर्थपूर्ण व्यावहार करून सरास रापचे नियम धाब्यावर बसविले जात आहे. अनुकंपा प्रकरणे प्रकरणी कु. निशा लोंढे यांनी अनुकंपा प्रकरणामध्ये कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतरही मुद्दाम हेतुपुरस्सरपणे त्यांचे अनुकंपा प्रकरण प्रलंबित रहावे या उद्देशाने त्यांचे प्रकरण अद्याप पर्यंत मध्यवर्ती कार्यालयाकडे का ? पाठविलेले नाही न पाठविण्या मागे काही तरी दडलेले दिसते, शेगांव आगारातील विठ्ठल पांडूरंग बहाड यांना हेतुपुरस्सरपणे अद्यापर्यंत वार्षिक वेतनवाढ देण्यात आले नाही, असे स्पष्ट होत आहे, तरी प्रकरणी चौकशी करावी, निवेदनात नमूद आहे.

पुढे निवेदनात नमूद आहे की, बुलडाणा विभागात विभाग नियंत्रक १ मार्च २०२३ रोजी विभाग नियंत्रक रूजू झाले तेव्हापासून तर ते अद्यापपर्यंत ज्या चालक, वाहक, यांत्रिक, वाहतुक नियंत्रक, वाहतुक निरिक्षक यांच्या ज्या बढत्या, बदल्या, नियुक्ती देतांना सर्व प्रकारच्या जेष्ठता डावलून मर्जीतील लोकाना बढती, बदल्या व नियुक्ती देतांना आर्थिक व्यवहार करून सर्वच कामगारांकडून पैसे घेऊन नियमबाह्य व सेवा जेष्ठता तसेच कुठल्याच कामगारांचा विनंती अर्ज न पाहता बढती, बदली व नियुक्ती नियम बाह्य आर्थिक व्यावहारातून देण्यात आल्या आहे असे अनेक प्रकरणाची विभाग नियंत्रक यांच्या मनमानी कारभाराची चौकशी करण्यात यावी, असे निवेदन रा.प. विभाग कार्यालय, बुलडाणा यांच्या मार्फत उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक रा.प. मध्यवर्ती मुंबई यांच्याकडे केली आहे, दिलेल्या निवेदनावर गजानन सु. माने राज्य उपाध्यक्ष महाराष्ट्र एस.टी. कामगार सेना, मुंबई यांची सही आहे

# महाबीज चा ४८ वा वर्धापन दिन साजरा...

**जनसंचलन/ चिखली**



महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाचा ४८ वा वर्धापन दिन बिज प्रक्रिया केंद्र चिखली येथे उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन केंद्र प्रमुख श्री आंनद खरात यांनी केले महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाची स्थापना २८ एप्रिल १९७६ रोजी झाल्यापासून आतापर्यंत महाबीज ची उत्तरोत्तर होत गेलेली प्रगतीचा चढता आलेख तसेच महाबीज च्या प्रगती मध्ये महाबीज चे भागधारक,बिजोत्पादक,कर्मचारी,महामंडळाचे संचालक मंडळ आणि शासनाचे सहकार्य लाभले व सर्वाच्या परीश्रमामुळे शेतकऱ्यांच्या मनामध्ये निर्माण झालेली चांगली प्रतिमा तसेच महाबीज बिजोत्पादक शेतकरी वितरका साठी राबवित असलेल्या विविध योजना बाबत माहिती महाबीज चे क्रुषि क्षेत्र अधिकारी रविंद्र राठोड यांनी दिली.महाबीज चे भागधारक हरीभाऊ येवले यांनी आपल्या भाषणा मध्ये महाबीज च्या आगामी खरीप हंगामा मध्ये सोयाबीन वाण फुले संगम,फुले किमया,आंबा,सुवर्ण सोया,या नविन वानाबद्दल व तसेच शुन्य मशागत तंत्रा संबधी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रम प्रंसगी महाबीज चे भागधारक रामेश्वर पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना महाबीज च्या कर्मचाऱ्यांची बिजोत्पादक आणि शेतकरी यांच्याशी असलेली आपुलकीची वागणूक आणि वेळोवेळी मिळत असलेले योग्य मार्गदर्शन या बाबत प्रंशसा केली. क्रुषि अधिकारी अंनता अंभोरे आणि अंनतराव भुतेकर यांनी क्रुषि विभागाच्या विविध योजना बाबत माहिती दिली. सदर कार्यक्रमास महाबीज चे व तसेच सवणा येथील बिजोत्पादक शेतकरी विजय भुतेकर,ज्ञानेश्वर शेळके,नितीन शेळके,शरद पाटील सा.डुकरे व बहुसंख्य बिजोत्पादक शेतकरी हजर होते. कार्यक्रम यशस्वीते साठी बिज प्रक्रिया केद्र चिखली येथील श्री किरण झोरे,मनोज माळोदे,उमेश तायडे,निलेश खर्चे,श्री ओरोकार,सौ.वैशाली सिरसाठ आणि कविता मेरट यांनी परीश्रम घेतले

# लग्नसराई दाट असल्यामुळे बसफेऱ्या वाढविण्याची प्रवाशांची मागणी..



**जनसंचलन/बुलढाणा**

मे महिन्यामध्ये मोठ्या संख्येने लग्न विवाहाची दाट तारखा आहेत. तसेच शाळकरी विद्यार्थ्यांचीही या गर्दीत प्रवास करून दमछाक होत आहे. विद्यार्थी व तसेच महिला सन्मान या योजनेच्या माध्यमातून मोठ्या संख्येने महिला वर्ग प्रवास करीत आहे. त्यामुळे मोताळा तालुक्यातील मार्गावर बसफेऱ्या वाढविण्याची मागणी केली जात आहे. एप्रिल महिन्याच्या शेवटचा आठवडा, तसेच मे महिना सुरू होत आहे. मात्र, सध्या वाढत्या लग्नसराईच्या पार्श्वभूमीवर बसस्थानकावर झालेली गर्दी. तापमानामुळे बसमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांना गर्दीमुळे त्रास सहन करावा लागत आहे. प्रवाशांच्या गर्दीमुळे बसस्थानकारवर काही असुविधांचा सामना प्रवाशांना करावा लागत आहे. मे महिना लग्नसराईचा असल्यामुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने बसफेऱ्यांची संख्या वाढवावी, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

# मेरा बु केंद्रावर सरासरी ५३ टक्के मतदान

**जनसंचलन/ चिखली**



तालुक्यातील मेरा बु. येथे लोकसभेसाठी शुक्रवारी दुसऱ्या टण्यात एकूण सहा मतदान केंद्रावर सरासरी ५३ टक्के मतदान शांततेत पार पडले. मेरा बुद्रुक येथे एकूण ५१९७ मतदार असून त्यापैकी २७८२ एवढ्या मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यामध्ये पोस्टाने मिळालेले मतदान वगळता, मतदान केंद्र क्रमांक ३९ मध्ये एकूण मतदान १११४ त्यापैकी झालेले मतदान ६०८, मतदान केंद्र क्रमांक ४० एकूण मतदान ६५० त्यापैकी ३२६ मतदान झाले. केंद्र क्रमांक ४१ एकूण मतदान ७९९ त्यापैकी ४५७ मतदान झाले. केंद्र क्रमांक ४२ एकूण मतदान ८७० त्यापैकी ४७३ मतदान झाले. मतदान केंद्र क्रमांक ४३ एकूण मतदान १११० त्यापैकी ३९२ मतदान झाले. मतदान केंद्र क्रमांक ४४ एकूण मतदान ६५४ त्यापैकी ३२६ मतदान झाले. या मतदानासाठी मतदान केंद्रावर सकाळपासूनच मतदाराच्या रांगा लागल्या होत्या. उन्हामुळे दुपारी थोडी शांतता तर, दुपारनंतर परत मतदार मतदानाचे आपले कर्तव्य बजावण्यासाठी घराबाहेर पडले. मतदानाची एकूण सरासरी टक्केवारी बघता बऱ्याच मतदारांनी मतदान करण्यासाठी पाठ फिरवल्याचे चित्र दिसले. लोकसभेचे मतदान शांततेत पार पाडावे. यासाठी निवडणूक आयोगाने केंद्र अध्यक्ष तथा सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांची व्यवस्था गावातील प्रतिष्ठित नागरिक, नवयुवक, पोलीस पाटील, ग्रामपंचायत कर्मचारी, तसेच अंगणवाडी कर्मचारी यांनी चोख व्यवस्था करून परीश्रम घेतले. मतदानाच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून, अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार विकास पाटील यांनी मेरा बु. केंद्रांवर जळगाव खानदेश येथील पोलीस अधिकारी कर्मचारी यांचा कडक बंदोबस्त तैनात केला होता. तसेच अंढेरा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील ४८ गावातील मतदान केंद्रावर सुध्दा कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आल्याने लोकसभेची मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## कोयता घेऊन दहशत निर्माण करणाऱ्यास पोलिसांनी ठोकल्या बेड्या



**जनसंचलन/ नांदुरा**

तालुक्यातील ग्राम वडाळी येथे दारूच्या नशेत दुचाकीवरून फिरत एका हातात कोयता घेऊन लोकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्यास नांदुरा पोलिसांनी २७ एप्रिलच्या सायंकाळी ६ वाजेदरम्यान पकडल्याची घटना घडली असून आरोपीविरुद्ध शस्त्रास्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार पोहेकॉ मिलिंद जवंजाळ यांनी नांदुरा पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की, वडाळी येथील आरोपी गोपाल भगवान वक्टे वय ३५ वर्षे हा हातात धारदार कोयता घेऊन वडाळी-कोळंबा रस्त्यावर उभा राहून आज कोणाला तरी कापून टाकतो असे म्हणत लोकांमध्ये दहशत निर्माण करत असल्याच्या मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपीच्या ताब्यातून एक धारदार स्टीलचा कोयता किं. ५०० रु. रुपये व एक काळ्या रंगाची दुचाकी क्रं एम एच - १९ सी.जे. ९५६८ किं. ४४,००० असा एकूण ४४ हजार पाचशे रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच आरोपीविरुद्ध शस्त्रास्त्र कायद्याच्या कलम ४,२५ तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ८५,१ ११०,११२ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकॉ काशीराम जाधव करीत आहेत.

# जिल्ह्यात दूषित पाण्यामुळे जलजन्य आजारांचा धोका वाढला...

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून तापमानाचा पारा वाढत असल्याने दिवसागणिक पाण्याची पातळी कमी होत आहे. काही महिन्यापासून लहान मोठ्या प्रकल्पांसह विहिरींनी तळ गाठला आहे.त्यामुळे जिल्हाभरातील ३८ पेक्षा अधिक गावे पाणीटंचाईमुळे त्रस्त झाली आहेत. परिणामी दुषित स्त्रोताचे पाणी पिण्यासाठी वापरले जात असल्यामुळे ग्रामीण भागात जलजन्य आजाराचा धोका वाढला आहे. साथीचे आजार पसरवू नये, यासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना करण्याची गरज षनिर्माण झाली आहे.झाल्यामुळे नदी नाल्यांना पूर गेले नाहीत. त्यामुळे पाहिजे त्या प्रमाणात प्रकल्पात जलसाठा उपलब्ध झाला नाही. त्यातच पाण्याचा भरमसाठ होत असलेला वापर व दाहकत्याण उन्हामुळे होत असलेले बामीभवन यासह इतर कारणांमुळे अनेकांनी तळ गाठला आहे. जिल्ह्यातून सर्वात मोठा असलेला खडकपूर्णा प्रकल्प फेब्रुवारी महिन्यातच आटला आहे. त्यामुळे या प्रकल्पावर अवलंबून असलेली तीन शहरे व ४४ गावाचा पाणीपुरवठा प्रभावीत झाला आहे. तहान भागवण्यासाठी बहुतांश नागरिक नदी-नाले व तलावातील दुषित पाण्याचा पिण्यासाठी वापर करतात. अशुद्ध पाणी पिल्यामुळे टायफाइड हा आजार होतो. या आजाराकडे दुर्लक्ष केल्यास मृत्युची शक्यता असते. त्या सोबतच अशुद्ध पाण्यामुळे गॅस्ट्रो होतो. हा आजार खुल्या विहिरी, कूपनलिका,तलावातील पाण्याच्या जिल्ह्यात तीन मोठे प्रकल्प असून सात मध्यम व ७२ लघु प्रकल्प आहेत. या प्रकल्पावर अनेक शहर व गावांचा पाणीपुरवठा अवलंबून आहे. परंतु, मागील वर्षी जिल्ह्यात पावसाचे अत्यल्प प्रमाण वापरामुळे होतो. अतिसार हा सुध्दा जलजन्य आजारआजार झाल्यास रुग्णांनी तत्काळ शासकीय रुग्णालयात जावून उपचार करावा. अशा जलजन्य आजाराचे तालुक्यातील प्रत्येकी पाच



गावांचा समावेश आहे. टंचाईग्रस्त गावांना प्रत्येक एक टँकरने तर मोताळा तालुक्यातील राजूर गावाला दोन टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. पाण्यामुळे जलजन्य आजाराची लागण होण्याची दाट शक्यता असेत. तसेच पाण्याचे शुद्धीकरण करण्यापूर्वी पाणी वापरल्यास अनेक आजार संभवतात. पाणी बदलल्यामुळे आणि दुषित पाण्यामुळे अनेक जलजन्य आजार होत असल्यामुळे सध्या पिण्यासाठी शुद्ध पाणी महत्वपूर्ण ठरत आहे. पाण्याचा वापर जपून केल्यास ते आरोग्यास हितकारक ठरणारे आहे. प्रत्येक गावांत शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाने तातडीने जलशुद्धीकरण केंद्र उभारणे आवश्यक झाले आहे.

# जुन्या वादातून दोन व्यक्तींनी एका व्यक्तीला लोखंडी रॉडने केली मारहाण

**जनसंचलन/ जळगाव जा.**

तालुक्यातील सुनगाव येथे जुन्या वादातून दोन व्यक्तींनी एका व्यक्तीला लोखंडी रॉडने मारहाण केल्याची घटना २८ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजेदरम्यान घडली. फिर्यादी सुवर्णसिंग विठ्ठल सिंग राजपूत राहणार सुनगाव हे गावातीलच अनिल राजपूत यांच्या पान टपरी जवळ उभे असताना आरोपी किशोर येऊल, विजय येऊल या दोघांनी फिर्यादी सुवर्ण सिंग राजपूत यांना जुन्या भांडणाच्या कारणावरुन शिविगाळ करुन त्यांच्या हातात असलेल्या स्टिलच्या रॉडने दोघांनी फिर्यादी यांना जिवे मारण्याचे उददेशाने फिर्यादी यांचे दोन्ही पायावर, हातावर, डोक्याच्या मागचे बाजुला, कपाळावर मारुन गंभीर जखमी केले तसेच डाव्या हातावर व बोटावर मारून जखमी केले व फिर्यादी यांना आरोपीनी मारत असतांना याला जिवाने मारुन टाकु असे बोलत होते. नंतर तेथे गावातील ज्वालासिंग कल्याणसिंग राजपुत व अनिल उदयसिंग राजपुत हे हजर आले व त्यांनी भांडण सोडविले. त्यानंतर गावातील प्रेमसिंग राजपुत यांनी फिर्यादी यांना त्यांचे गाडीत ग्रामिण रुग्णालय, जळगाव जामोद येथे उपचार कामी आणले व ग्रामीण रुग्णालयातच फिर्यादीची जबानी घेण्यात आली व त्यांच्या तक्रारीवरून आरोपीवर कलम ३०७, ३२६,५०४,५०६, ३४ भादंवि गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीला पुढील उपचारासाठी खामगाव येथे रेफर करण्यात आले आहे. पोनि महाजन यांच्या आदेशाने सपोनि पी. आर. इंगळे पुढील तपास करीत आहे.

## पत्नी व सासऱ्यास मारहाण केल्याप्रकरणी पतीविरूद्ध गुन्हा दाखल

**जनसंचलन/ शेगाव**

येथील नागझरी रोडवरील तीन पुतळे परिसरात पती कडून पत्नी व सासऱ्याला मारहाण केल्याची घटना २७ एप्रिल रोजी संध्याकाळी ६.३० वाजता घडली आहे. याबाबत पत्नी सौ. मनीषा राजेंद्र इंगळे वय २६ यांनी शहर पोलिसात तक्रार दिला की, १० वर्षांपूर्वी आरोपी राजेंद्र दादाराव इंगळे सोबत लग्न झाले होते. त्यानंतर आम्ही मुंबई येथे एकत्र राहली परंतु एक वर्षांपूर्वी आमच्यात वाद झाल्याने मी पतीपासून शेगाव येथे वडिलांकडे विभक्त राहत होती. परंतू पती मुंबई वरून शेगाव आला व मोबाईलवर कॉल करून मला तुला भेटायचे आहे



असे म्हटले असता त्यावर आधी वडिलांशी बोला असे मी सांगितले. त्यानंतर माझ्या वडिलांच्या घरी दारू पिऊन येत मला व माझ्या वडिलांना मारहाण केली तसेच हातात वीट घेऊन जखमी केले अशा तोंडी रिपोर्ट व मेडिकल सर्टी वरून आरोपी विरुद्ध कलम ३२४, ३२३, ५०४, ५०५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जिल्ह्यात विविध भागात पिकांचे प्रचंड नुकसान

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस हजेरी लावत आहे. काही भागात अवकाळी पावसामुळे शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. दरम्यान ग्राम पाडळी परीसरात विजेचा कडकडाट व वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने आंबा पिकांचे नुकसान केले आहे. प्राप्त माहितीनुसार गुरुवार २५ एप्रिल संध्याकाळच्या वेळी आलेल्या वादळी वाऱ्याने जिल्ह्यात काही ठिकाणी भयंकर नुकसान केले आहे. अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात तडाखा बसला असून अनेकांच्या घरावरचे टिनपत्रे लोखंडी अँगलसह शंभर ते दीडशे फुटापर्यंत उडून गेले. त्यामुळे घरात साठवून ठेवलेले गहू, हरभरा, सोयाबिन आदी धान्याची पोती पावसाने भिजली आहेत. यासह कांदा, मका, बाजरी, ज्वारी या पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून ग्रामस्थांसह शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसला आहे.

## लोणार तालुक्यातील मुद्रांकांचा तुटवडा कामे लांबणीवर

**जनसंचलन/ लोणार**

मुद्रांक विक्रेत्यांच्या परवान्यांचे नूतनीकरण झालेले नसल्यामुळे लोणार तालुक्यात गेल्या ३ आठवड्यापासून मुद्रांकांचा तुटवडा निर्माण झाला आहे. जमीन खरेदी विक्री, शासकीय व शैक्षणिक प्रमाणपत्र तयार करण्यासाठी या मुद्रांकाची गरज भासते. मात्र, मुद्रांकाअभावी गरजू नागरिकांना पायपीट करण्याची वेळ आली असून अनेकांची कामे खोळंबली आहेत. लोणार शहरात ७ मुद्रांक विक्रेते आहेत. त्यांचा परवाना ३१ मार्चपर्यंत वैध होता. ३१ मार्चनंतर त्यांनी विहित मुदतीत परवाना नूतनीकरणासाठी रीतसर अर्ज केला आहे. सहाय्यक निबंधकांनी त्यांचे अर्ज बुलढाणा येथे पाठवले आहेत. परंतु परवान्याची मुदत संपली. २५ दिवस उलटूनही नवीन परवाना मिळालेला नाही. मुद्रांक विक्रेत्यांना स्टॅम्पच मिळत नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. अनेकांना व्यवहार करण्यात अडचणी येत आहेत. बांधकाम व्यावसायिकांना घर नावावर करून देण्यासाठी, शासकीय दस्तासाठी, विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी हमीपत्र, प्रतिज्ञापत्र, बँकांना देण्यासाठी, तसेच वाहन खरेदी करण्यासाठी मुद्रांकाची गरज असते. शहरात स्टॅम्प पेपर उपलब्ध नसल्याने शिक्षण, शेती, खरेदी-विक्रीची कामे पूर्णपणे खोळंबली आहेत. संबंधित विभागाने लवकरात लवकर स्टॅम्प पेपर सर्वसामान्यांना उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी होत आहे.

# शरद पवारांनी विचारलं, विखेंच्या पुढच्या पिढीने काय केलं? या प्रश्नावर सुजय विखेंकडून जोरदार उत्तर...

वृत्तसंस्था/ अहमदनगर

पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी पहिला सहकारी साखर कारखाना काढला, मात्र त्यांच्या पुढच्या पिढीने काय केले?फ असा सवाल करीत राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी राहुरीतील सभेत टीका केली होती. त्यांच्या या टीकेला विखे पाटलांच्या तिसऱ्या पिढीतील सदस्य, खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी उत्तर दिले आहे. ङ्कपद्मश्री पुढच्या पिढीने काय केले? हे समजून घेण्यासाठी ज्येष्ठ नेत्यांना पाच तास लागतील.फ असा टोला डॉ. विखे यांनी लगावला आहे. अहमदनगर लोकसभा मतदारसंघात महायुतीचे खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि महाविकास आघाडीचे नीलेश लंके यांच्यात लढत होत आहे. लंके यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार गटातून पुन्हा पवार गटात प्रवेश केल्यानंतर त्यांना पवार गटाकडून उमेदवारी देण्यात आली आहे. पवार आणि विखे यांच्यात जुनाच राजकीय संघर्ष आहे. या निवडणुकीत त्याला पुन्हा एकदा उजाळा मिळत आहे. पवार यांनी या मतदारसंघात व्यक्तीशः लक्ष घातले आहे. आतार्यंत ते तीन वेळा मतदारसंघात येऊन गेले. आणखी तीन सभा होणार असल्याचे सांगण्यात येते. सभेत बोलताना राष्ट्रीय मुद्यांसोबतच पवार विखे पाटील यांच्यावर टीका करतात. राहुरीच्या सभेतही त्यांनी विखे पाटील यांच्या परिवारावर टीका केली होती.त्यावरून आता डॉ. विखे पाटील यांनी पारनेर तालुक्यातील एका मेळाव्यात बोलताना पवार यांना उत्तर दिले आहे. डॉ. विखे पाटील म्हणाले, या निवडणुकीत निम्मे काम जेष्ठ नेत्यांनी करून टाकले आहे. आता उरलेले निम्मे काम १३ मे रोजी मतदार संघातील जनता करेल. शरद पवारांच्या पक्षाला उमेदवार आयात करावा लागला. हा उमेदवार कसा आहे? हे पारनेरच्या जनतेला चांगले माहिती आहे. मात्र, पारनेरच्या जनतेला २०१९ मध्ये केलेली चूक सुधारण्याची संधी आहे. मागील पाच वर्षांत केलेल्या विकास कामांचा लेखाजोगा मतदारांपुढे आहे. जे केले तेच आपण सांगतो. या मतदारसंघातील युवकांचे भवितव्य सुरक्षित ठेवण्याची माझी जबाबदारी आहे. लोकसभेची ही निवडणूक देशाचे उज्वल भवितव्य घडवणारी आहे. नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान पदावर विराजमान होतील आणि नगरचा खासदारही महायुतीचाच असेल, असेही डॉ. विखे पाटील म्हणाले.भाजपचे तालुका अध्यक्ष राहुल शिंदे, माजी नगराध्यक्ष विजय औटी, काशिनाथ दाते, प्रा. विश्वनाथ कोरडे, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष विक्रम कळमकर यांनीही आपली मते मांडत लंके यांच्या कार्यपद्धतीवर टीका केली.





# इकडचे मोठे उद्योग, रोजगार गुजरातला पळवून नेले त्यावेळी महाराष्ट्राची आठवण झाली नाही का? - नाना पटोले





वृत्तसंस्था/मुंबई

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रातील सोलापूर, सातारा व पुण्यातील प्रचारसभेतून तेच तेच काँग्रेस विरोधी रडगाणे गायले. मोदी यांना प्रचारासाठी सातत्याने महाराष्ट्रात यावे लागते हे भाजपाचा दारूण पराभव होत असल्याचे स्पष्ट संकेत आहेत. महाराष्ट्रातील मोठे उद्योग, गुंतवणूक व रोजगार गुजरातला पळवून नेले त्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना महाराष्ट्राची आठवण झाली नाही, कांद्यावरील निर्यात बंदी उठवताना मोदींना महाराष्ट्राची आठवण झाली नाही फक्त गुजरात आठवला, आज पराभव दिसू लागल्याने पंतप्रधान मोदींना महाराष्ट्राची आठवण झाली का? असा सवाल करत महाराष्ट्रातील जनता आता मोदींच्या भुलथापांना बळी पडणार नाही, असा इशारा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिला. नरेंद्र मोदी धादांत खोटे बोलत आहेत, खोटे बोलण्यात नरेंद्र मोदींचा कोणी हात धरू शकत नाही. काँग्रेस पक्ष आरक्षण संपवत आहे हा मोदी यांचा आरोप अत्यंत चुकीचा व हास्यास्पद आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून दिल्यानंतर लोकशाही व्यवस्था व संविधान तसेच संविधानाच्या माध्यमातून सर्वसामान्य गरीब जनता, एससी, एसटी, मागासवर्गीयांना हक्क व अधिकारासह आरक्षणही दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाला व संविधानाने दिलेल्या आरक्षणाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भारतीय जनता पक्षाचा पहिल्या पासूनच विरोध आहे. मागील १० वर्षात धनगर, आदिवासी, मराठा समाजाला आरक्षण देतो म्हणून त्यांची घोर फसवणूक करणाऱ्या भाजपावर आता जनता विश्वास ठेवणार नाही.ओबीसींच्या आरक्षणाचा घोळ घालून राजकीय प्रतिनिधित्व मिळण्यापासून या समाजाला वंचित ठेवण्याचे पाप ह्याच नरेंद्र मोदी, देवेंद्र फडणवीस व भाजपाने केले आहे. ४०० जागा जिंकल्या की घटना बदलू असे जाहीर सांगणारे मोदींचे खासदार व मंत्रीच आहेत पण जनता भाजपाला घरी बसवणार याची जाणीव होताच मोदींनी भाषा बदलली. आरक्षणाचे खरे विरोधक भाजपा, आरएसएस व नरेंद्र मोदी आहेत व संधी मिळाली तर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान बदलणार हे स्पष्ट आहे.काँग्रेस पक्षाने दलित नेत्यांचा अपमान केला हे आणखी एक असत्य व खोटारडे विधान नरेंद्र मोदी करत आहेत. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना नवीन संसद भवनच्या पायाभरणी कार्यक्रमाला नरेंद्र मोदी यांनी बोलावले नाही. महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अयोध्येतील राम मंदिराच्या उद्घाटन सोहळ्याला बोलावले नाही, संसदेच्या नवीन इमारतीच्या उद्घाटनालाही बोलावले नाही, कारण त्या आदिवासी समाजाच्या आहेत म्हणून, हा त्यांचा अपमान नाही का? परंतु मोदी म्हणजे खोटे बोल पण रेटून बोल. मागील १० वर्षात देशातील दलित, मागास, अल्पसंख्याक समाजावरील अत्याचारात प्रचंड वाढ झाली आहे, हे मोदी विसरले असतील पण जनता विसरली नाही.भाजपाच्या नेत्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह महापुरुषांचा सातत्याने अपमान केला. शिवाजी महाराज हे भाजपाला फक्त मतांसाठी हवे आहेत, निवडणुका आल्या की छत्रपतींचे नाव घेता व नंतर त्यांचा अपमान करता हीच भाजपाची निती आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी ५ वर्षात सोलापुरात पाचवेळा आले पण ५ लोकांनाही रोजगार देऊ शकले नाहीत. शहराला सात दिवसातून एकदा पाणी येते, हर घर नल, नल में जल ही मोदी यांची योजना सोलापुरात फेल गेली आहे, सोलापुरात नल है पर नल में जल नही, अशी परिस्थिती आहे, असे नाना पटोले म्हणाले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958